लोकमत
26/06/2012

# ठक्करर्स डेव्हलपर्सचा लाभांश जाहीर

नाशिक | दि. २५ (प्रतिनिधी)

उत्तर महाराष्ट्रातील रियल इस्टेट क्षेत्रातल्या अग्रगण्य ठक्कर्स पब्लिक लिमिटेड कंपनीने आपल्या भागधारकांसाठी १३ टक्के लाभांशाची घोषणा केली आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.सन २०११-१२ या आर्थिक वर्षात कंपनीची ४५५२.३० लाख रुपये इतकी उलाढाल झाली आहे. कंपनीला १८२५.६२ लाख रुपये इतका कर वजावटी पूर्वी नफा झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत कंपनीचा नफा १०.८८ टक्क्यांनी वाढला आहे.